नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४४ Issue - 44 | वार सोमवार दि. ३० जून २०२५ Blow- Monday Date 30 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# हिंदी भाषा सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्द

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हिंदी भाषेबाबत मोठा निर्णय; विधी मंडळाचे उद्यापासून पावसाळी अधिवेशन सुरु होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयावरुन मोठा वाद निर्माण झाला आहे. शिवसेना ठाकरे गट आणि मनसे पक्ष या निर्णयाविरोधात येत्या ५ जुलैला भव्य मोर्चा काढणार आहेत. तसेच विविध पक्षांकडून या निर्णयाला विरोध होतोय. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने आता मोठा निर्णय घेतला आहे. विधी मंडळाचं उद्यापासून पावसाळी अधिवेशन सुरु होणार आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज मुंबईत सह्याद्री अतिथीगृह येथे चहा-पानाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत हिंदी भाषेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची एकत्रित पत्रकार परिषद पार पडली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषाबाबत याआधी घेतलेले दोन्ही शासन निर्णय मागे घेत असल्याची घोषणा केली.



हिंदीचा विषय हा आमच्याकरता मराठीचा विषय आहे. आम्ही राज्यात मराठी अनिवार्य केली आहे. कुणालाही भारतीय भाषा शिकता येईल, असा निर्णय आम्ही घेतला आहे. तरीही झोपलेल्याला उठवता येतं पण झोपेचं सोंग करणाऱ्याला उठवता येत नाही. हिंदी ऑप्शनल आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे सर्वात आधी कर्नाटकने लागू केलं. त्यानंतर मध्य प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेशने लागू केलं. २१ सप्टेंबर २०२० रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हे शैक्षणिक धोरण कशाप्रकारे लागू करायचं यासाठी एक तज्ज्ञ समिती नियुक्त केली होती. १६ ऑक्टोबर २०२० ला त्याचा जीआर निघाला. अतिशय नामवंत अभ्यासक या समितीत होते. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ लोकांची कमिटी तयार करण्यात आली. या समितीमधील सर्व लोकं मराठी, नामवंत, शिक्षण क्षेत्र समजणारे लोकं आहेत. १४ सप्टेंबर २०२१ रोजी या समितीने १०१ पानांचा अहवाल सादर केला. त्याचं ट्विट माझ्याकडे आहे. तो अहवाल स्वीकारताना उद्धव ठाकरे देखील होते. डीजीआयपीआरने याबाबत ट्विट केलं होतं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

या अहवालाच्या आठव्या प्रकरणात भाषेचा विषय आला आहे. पृष्ठ क्रमांक ५६ वर अहवालात भाषेचा विषय आहे. यामध्ये उपगट निर्माण करण्यात आला होता. या उपगटात महत्त्वाचे सदस्य उबाठाचे विजय कदम हे नेते होते. त्यांनी मुद्दा क्रमांक ८.१ इंग्रजी आणि हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्गापासून लागू करण्यात यावी. पहिली ते बारावी असे बारा वर्षे विद्यार्थी इंग्रजी शिकतील तर त्यांना इंग्रजी भाषेची जाण येईल. आवश्यक इंग्रजी पुस्तक वाचता येतील. पुढील अभ्यासाठी ते सक्षम असतील. इंग्रजी आणि हिंदी या भाषा सक्तीची करण्यात यावी. पदवीधर शिक्षणातही हिंदी सक्तीची करण्यात यावी. उबाठाच्या उपनेत्यांनी ही शिफारस केली आहे, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. हा अहवाल सादर झाल्यानंतर मंत्रिमंडळात आला. त्यानंतर ७ जानेवारी २०२२ ला इतिवृत्त झाला. माझ्याकडे याचं इतिवृत्त सुद्धा आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांची सही आहे. अहवाल स्वीकारताना कुठेही त्रिभाषा सूत्र बाजूला ठेवा, आम्हाला मान्य नाही, असं कुठेही म्हटलेलं नाही. उलट तिसरी भाषा का हवी? ॲकेडमीक बँक ऑफ क्रेडीटलाही याच मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

काही लोकं म्हणतात आम्ही निर्णय घेतला नाही. केवळ अहवाल स्वीकारला. नाही. या ठिकाणी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय घेऊन त्याला मान्यता दिली. त्यावर अंमलबजावणी करण्यासाठी समिती स्थापन केली. ती कमिटीने काम करत-करत आमच्या काळात जीआर निघाले आहेत, असा खुलासा फडणवीसांनी केला.

आम्ही १६ एप्रिल २०२५ ला पहिला जीआर काढला. त्या जीआरमध्ये आपण म्हटलं की, मराठी सक्तीची आहे. दुसरी भाषा इंग्रजी म्हटली, तिसरी भाषा हिंदी म्हटली. त्यावर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर १७ जूनला जीआर बदलला. यामध्ये सांगितलं की, कुठलीही भारतीय भाषा ही तिसरी भाषा शिकता येईल. तिसरी भाषा ही पहिली पासून नाही. त्याचं लेखन-वाचन हे तिसरी पासून आहे. पहिले दोन वर्ष हे फक्त बोली आहे. हा जो काही अहवाल आमच्याकडे मांडण्यात आला होता त्यानुसारच आमच्या सरकारने निर्णय घेतला नव्हे. तर सक्तीची केलेली हिंदी आमच्या भाषेने ऑप्शन देण्याचं काम केलं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# ५ जुलैला विजयी जल्लोष होणार : उद्धव ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारने शालेय शिक्षणात हिंदी सक्तीच्या निर्णयाबाबत घेतलेले दोन्ही शासन निर्णय रद्द केले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत घोषणा केली. हिंदी सक्ती विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र मोर्चा काढणार होते. पण आता याबाबत शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने हा एकत्रित मोर्चा होणार नाही, असं ट्विट ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलं. पण यानंतर उद्धव ठाकरे यांची पत्रकार परिषद पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी महत्त्वाची घोषणा केली.




येत्या ५ जुलैला विजयी जल्लोषाचा मोर्चा किंवा सभा घेण्यात येईल. याबाबत दोन दिवसांत सर्वांशी चर्चा करुन माहिती देऊ, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. तसेच या कार्यक्रमात सर्वांनी एकत्र यावं, असं आवाहन देखील उद्धव ठाकरे यांनी केलं. तसेच ५ जुलैला मराठी माणसं एकत्र येणार असल्याने सरकारने हिंदी सक्तीचा शासन निर्णय मागे घेतला, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

आज संपूर्ण राज्यभरात हिंदीसक्ती भाषेच्या विरोधात आंदोलन केलं गेलं. सर्व मराठी भाषिकांनी ते आंदोलन केलं. सरकारने काढलेल्या जीआरची होळी केली. मी सुद्धा स्वत: या आंदोलनात सहभागी झालो. शिवसैनिक सुद्धा होते. मला अभिमान आहे की, मराठी माणसाच्या शक्तीसमोर सरकारची शक्ती हरलेलं आहे. मराठी माणूस एकत्र झाला तर सरकारची शक्ती हरवू शकते हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. अशीच चळवळ संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळीला देखील झाली होती. पण तेव्हाच्या आणि आताच्या परिस्थितीची तुलना करता येणार नाही. पण सर्वजण पक्षभेद विसरुन एकत्र झाले. त्यावेळेलाही डाव उधळला होता. आजही डाव उधळून लावला आहे, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. मला खरंच एका गोष्टीचं वैषम्य वाटतं की, आपल्या राज्यातील जे सरकार आहे त्या सरकारने हा प्रयत्न केला की, मराठी भाषेची एकजूट फोडायची, मराठी अमराठी असा भेद निर्माण करायचा आणि अमराठी मते आपल्या पदरात पाडून घ्यायची, असा हा भाजपचा छुपा अजेंडा यामध्ये होता. पण समाधानाची गोष्ट अशी की, मराठी माणसाने सामंजस्याची भूमिका घेतली. आमचा भाषेला विरुद्ध नाही तर सक्तीला विरोध आहे. त्यामुळे फूट पडली नाही, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली.

# ‘ही भीती असली पाहिजे..’ : हिंदी सक्तीवरून राज ठाकरेंची प्रतिक्रिया

मुंबई : पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तिसरी भाषा शिकणे अनिवार्य करण्याच्या निर्णयावरुन गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात मोठा वाद सुरु होता. तिसरी भाषा सक्तीच्या करण्याच्या मागे सरकारचा हिंदी सक्ती करण्याचा डाव असल्याचं विरोधी पक्षांनी म्हटलं होतं. सरकारच्या या निर्णयाविरोधात राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात येत होता.



**राज ठाकरे यांची फेसबुक पोस्ट जशीच्या तशी**

इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला. सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले. याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही, कारण ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली. हिंदी भाषेसाठी सरकार इतका अट्टाहास का करत होतं आणि यासाठी सरकारवर नक्की कुठून दबाव होता, हे मात्र अजून गूढच आहे. पण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावीच म्हणून तीन भाषा लादण्याचा जो प्रयत्न होता तो एकदाचा हाणून पाडला गेला आणि यासाठी महाराष्ट्रातील तमाम जनतेचं अभिनंदन. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एप्रिल २०२५ पासून या विषयावर आवाज उठवला होता आणि तेंव्हापासून हा मुद्दा तापायला लागला. त्यानंतर एक एक राजकीय पक्ष आवाज उठवायला लागले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पक्षविरहित मोर्चा काढायच्या ठरवल्यावर अनेक राजकीय पक्षांनी, संघटनांनी त्यात सहभागी होण्याची तयारी दाखवली. हा मोर्चा जर झाला असता तर इतका विशाल झाला असता की संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळाची आठवण व्हावी. कदाचित या एकजुटीचा धसका सरकारने घेतला असेल, पण हरकत नाही ही भीती असली पाहिजे. अजून एक गोष्ट, सरकारने पुन्हा एकदा नवीन समिती नेमली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतोय समितीचा अहवाल येऊ दे किंवा नको येऊ दे परंतू हे असले प्रकार परत खपवून घेतले जाणार नाहीत म्हणजे नाहीत ! ही गोष्ट सरकारने कायमची त्यांच्या मनात कोरून ठेवावी !

## इंदापुरात जमला वैष्णवांचा मेळा

## पालखी सोहळ्याने भाविकांच्या डोळ्याची पारणे फिटली

# संत तुकारामांच्या अश्वांचं दुसरं रिंगण सोहळा इंदापुरात उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

पुण्याच्या इंदापूर मधील रयत शिक्षण संस्थेच्या सौ कस्तराबाई श्रीपती कदम विद्यालयाच्या प्रांगणात आज संत तुकोबांच्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वाचं दुसरं गोल रिंगण पार पडलं. यात वारकऱ्यांसोबत देहू पासून पंढरीपर्यंत कर्तव्य बजावणारे पोलीस देखील धावले. रिंगण सोहळा पार पडल्यानंतर वारकरी महिलांसह पोलिसांनी ही फुगडी खेळून आनंद उत्सव साजरा केला. देहू पासून प्रस्थान झाल्यापासून मजल दरमजल करत लाखो वारकरी पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात. ऊन वारा पाऊस झेलत वारकऱ्यांसमवेत पोलीस देखील रात्रंदिवस मैदानात असतात. त्यामुळे कुठेतरी कामाचा शीण आलेला असतोच. हाच शीण झटकून टाकण्यासाठी पालखी सोहळ्याच्या वतीने आज इंदापूर मधील रिंगण सोहळ्यात पोलीस कर्मचाऱ्यांनाही धावण्याचे आवाहन करण्यात आलं. यात पोलीस कर्मचाऱ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला.

इंदापूर मधील रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात डोळ्याचे पारणे फेडणारा हा सोहळा दुपारी बारा साडेबाराच्या सुमारास पार पडला. तुकाराम तुकाराम च्या जयघोषात सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी खांद्यावरती झेंडा घेत सर्वप्रथम प्रदक्षिणा घातली. त्यानंतर डोक्यावरती तुळशीवृंदावन घेतलेल्या महिला बोला पुंडलिक वर्धा हरी विठ्ठल पंढरीनाथ भगवान की जय असा जयघोष करीत मैदानातून धावल्या. लागलीच त्यांच्या पाठोपाठ विणेकऱ्यांनी ही आपलं रिंगण पूर्ण केलं. यानंतर पालखी सोहळ्याच्या वतीने पोलिसांना ही रिंगणात धावण्याचा आवाहन करण्यात आले, यामध्ये पोलिसांनी सहभागी होत तुकाराम च्या जयघोष करत धावतच रिंगण पूर्ण केलं.

यानंतर बाबुळगावकरांचा अश्व आणि अकलूजच्या मोहिते पाटलांच्या अश्वाचे रिंगणात आगमन झाले. दोन्ही अश्वांच पूजन झाल्यानंतर अश्वांना रिंगणाचा मार्ग दाखवण्यात आला. त्यानंतर रिंगण सोहळ्याला प्रत्यक्षात सुरुवात झाली. मैदानात एकच जल्लोष झाला. बाबुळगावकरांचा अश्व पुढे धावला तर त्या पाठोपाठ मोहिते पाटलांचा अश्व धावत होता. बाबुळगावकरांच्या अश्वावरती स्वतः जगद्गुरु तुकोबाराय बसलेले असतात अशी वारकऱ्यांची धारण आहे. तर पाठीमागे धावणाऱ्या मोहिते पाटलांच्या अश्वावरती चोपदार बसलेला असतो. हरिनामाच्या जयघोशात बघता बघता हा रिंगण सोहळा पार पडला आणि डोळ्याचं पारणं फिटलं.

रिंगण पार पडताच रिंगण सोहळ्याच्या मैदानात सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. यावेळी कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांचाही आनंद गगनात मावत नव्हता. वारीत सहभागी झालेल्या महिलांनी आणि कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांनी फुगडी खेळून आनंद साजरा केला.









देहू पासून आता पंढरीपर्यंत सेवा बजावत असताना कधीही ताण तणाव नव्हता माऊली माऊली करत आम्ही इथपर्यंत पोहोचलो, आतापर्यंत खूप सुखकर प्रवास झाला असून या वारकऱ्यांसोबत फुगडी खेळण्याचा आम्हाला मोठा आनंद मिळतो, अंगातील मरगळ झटकली जाते अशी प्रतिक्रिया पोलीस बांधवांनी दिली.

## संपादकीय....

### विजयी जल्लोष

राज्य सरकारने शालेय शिक्षणात हिंदी सक्तीच्या निर्णयाबाबत घेतलेले दोन्ही शासन निर्णय रद्द केले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत घोषणा केली. हिंदी सक्ती विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र मोर्चा काढणार होते. पण आता याबाबत शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने हा एकत्रित मोर्चा होणार नाही, असं ट्विट ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलं होतं. पण यानंतर उद्धव ठाकरे यांची पत्रकार परिषद पार पडली. यात त्यांनी म्हटले की, येत्या ५ जुलैला विजयी जल्लोषाचा मोर्चा किंवा सभा घेण्यात येईल. याबाबत दोन दिवसांत सर्वांशी चर्चा करुन माहिती देऊ, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. तसेच या कार्यक्रमात सर्वांनी एकत्र यावं, असं आवाहन केलं. तसेच ५ जुलैला मराठी माणसं एकत्र येणार असल्याने सरकारने हिंदी सक्तीचा शासन निर्णय मागे घेतला. आज संपूर्ण राज्यभरात हिंदीसक्ती भाषेच्या विरोधात आंदोलन केलं गेलं. सर्व मराठी भाषिकांनी ते आंदोलन केलं. सरकारने काढलेल्या जीआरची होळी केली. मी सुद्धा स्वतः या आंदोलनात सहभागी झालो. शिवसैनिक सुद्धा होते. मला अभिमान आहे की, मराठी माणसाच्या शक्तीसमोर सरकारची शक्ती हरलेलं आहे. मराठी माणूस एकत्र झाला तर सरकारची शक्ती हरवू शकते हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. अशीच चळवळ संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळीला देखील झाली होती. पण तेव्हाच्या आणि आताच्या परिस्थितीची तुलना करता येणार नाही. पण सर्वजण पक्षभेद विसरुन एकत्र झाले. त्यावेळेलाही डाव उधळला होता.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी चांदीचा मुकुट अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी विश्व मित्र साई कंट्रक्शन लातूर येथील भाविकांनी सुमारे १ किलो ९५ ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकुट अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.


त्याबद्दल देणगीदार भाविक यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन येथोचित सन्मान केला. या चांदीच्या मुकुटाची अंदाजे १ लक्ष ७ हजार इतकी किंमत होत आहे.



# कोणत्या वयच्या स्त्रीया कोणत्या ठिकाणी सुरक्षित आहेत?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आज आपण स्त्री जातीचा विचार केला तर कोणत्या वयोगटातील कोणत्या क्षेत्रातील स्त्री कोणत्या ठिकाणी सुरक्षित आहे हा प्रश्न मनात येतो. भारतीय संविधान लागु होण्या अगोदर महिलांचे जिवन म्हणजे सर्व बाजुंनी गुलामीची, बंदिस्त होते. चुल आणि मुल, स्त्रिने घेऊ नये, स्त्रिने उंबरठा ओलाडू नये, स्त्रिने पुरूषांच्या समोर बसु नसे, एवढेच काय आपला चेहरा सुद्धा इतरांना दाखवू नये, पुरुषांच्या अगोदर वा सोबत जेवण करू नये, अशा प्रकारचे अनेक बंधनात स्त्रियांना कायम बंधिस्त करून ठेवले होते. शिक्षण, हक्क अधिकार, मान सन्मान व मानवी स्वातंत्र्य ह्या बाबी कल्पनेच्या सुद्धा पलिकडच्या होत्या. परंतु संविधानाच्या आणि हिंदु कोडबिलाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना मानव समजून शिक्षण, हक्क अधिकार, मानसन्मान आणि पुरुषांच्या बरोबरीने स्थान निर्माण करून देऊन मानवी स्वातंत्र्य बहाल केले. म्हणुनच स्त्रिया शिकायला लागल्या, शिक्षण, नोकरी व विरंगुळा मनोरंजन करण्यासाठी घराबाहेर जायला लागल्या. स्वतःच्या आवडी निवडीने कपडे खाणपान घेऊ लागल्या. महिलांमध्ये सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक, आर्थिक क्रांती होऊन प्रत्येक क्षेत्रात महिला मोलाचे योगदान देत आहेत. एवढे असुनही ज्या विकृत मानसिकतेच्या लोकांनी महिलांना फक्त पुरुषांच्या उपभोगाच साधन समजले होते. त्याच वैचारिक विकृत संस्कृती चे लोक आजही महिलांना केवळ उपभोगाचे साधन समजून फक्त वासनेच्या नजरेने बघतात. खरं तर जगाचा उद्धार करणारी स्त्री भारतात कोणत्या ठिकाणी सुरक्षित आहे? या प्रश्नांवर मात्र कोणीही चर्चा करायला तयार नाही. माणसाचा सर्वात मोठा विश्वास असतो तो आई वडीलांवर आणि मानसाला सर्वात सुरक्षित व विश्वासाची जागा असते ती म्हणजे आईची गर्भपिशवी. त्या गर्भ पिशवीमध्ये कोणत्याही जिवाला कोणत्याही प्रकारचा धोका नसतो, कोणत्याही प्रकारचा संघर्ष नसतो. कारण काळजी करणारी आई असते. गर्भाला जपणारी आई असते. परंतु आईच्या पोटातही स्त्रीचा गर्भ असेल तर तोही सुरक्षित राहला नाही. आई वडीलच स्त्री गर्भपात करून आदर्श आई वडील होण्याची स्वप्न नेमकी पाहत तरी कशी असती. आईच्या गर्भाशयात आज स्त्री जिवंत राहते की नाही हि परिस्थिती असताना बाहेरच्या जगातील स्त्रीचा संघर्ष हा अंगावर काटा आणणारा आहे. मुलीचा जन्म झाला तरीही मुली सुरक्षित नाहीत मग तो कोणताही वयोगट असो. कारण येते दोन तिन वर्षाच्या मुलींपासुन तर नव्वद वर्षाच्या आजीपर्यंच्या स्त्रीया वासनागंध नराधमाच्या वासनेच्या शिकार झाल्या आहेत. काही प्रकरणात महिलांनी पुरुषांचा गैरवापर वा फसवणूक करून सुडबुद्धीने केलेले आरोप आपण वगळले तरीही नुकतीच जिवनाला सुरवात करणाऱ्या हसत खेळत बागडणाऱ्या मुलींवर आपल्या आजुबाजूच्या च व्यक्ती कडून बलात्कार होत असेल तर या विकृत माणसिकतेला काय म्हणावं? मुलीच्या उज्वल भविष्यासाठी शाळेत दाखल केल्या नंतर जिल्हा परिषद व खाजगी शाळेतही शिक्षकाकडून नवीन उमललेल्या कळीचे लैंगिक शोषण केले जाते या घ्रुनास्पद कृत्याला कोणतीही शिक्षा केली तरीही कमीच आहे. शाळेत जाणाऱ्या मुलींचे वय दहा वर्षापेक्षा ही कमी असते आणि तिच्या वर अत्याचार हे हेलावून टाकणारी घटना असते. तेरा चौदा वर्षाच्या मुली ऐक वयातही येण्याच्या काळात शाळेतील शिक्षकांच्या आणि परिसरातील बापाच्या वयाच्या किंबहुना त्यांच्या पेक्षा मोठ्या वयाच्या माणसाची नजर पडते आणि मुलींवर अत्याचार केले जातात. उच्च शिक्षणासाठी घराबाहेर पडलेल्या तरुणीही यामधून सुटत नाहीत. महाविद्यालयात, येण्याजाण्या रस्त्यावर वकिल, डॉक्टर, इंजिनिअर तरुणींनीची लैंगिक भुक भागविण्यासाठी सामुहिक





**विनोद पंजाबराव सदावर्ते**
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

पणे शिकार केली जाते अक्षरशः तिचे लचके तोडून अमानुष पणे हत्या केली जाते. असे अनेक उदाहरणे आहेत. जे मनाला सुन्न करून टाकतात. शिक्षण पुर्ण झाल्यानंतर नोकरीच्या ठिकाणी वेगवेगळ्या नजरा आणि चुकिच्या स्पर्शाचा सामाना महिलांना करावा लागतो. परंतु अनेक कामाच्या ठिकाणी वरिष्ठ लोकांकडून लैंगिक छळ झाल्याचे प्रकरण समोर आलेले असतात. अनेक महिला दुसरे लोक काय म्हणतील, मी इतरांना काही सांगितले तर मलाच चुकीचे समजतील या विचाराचा असतात म्हणून त्याही निमुटपणे लैंगिक अत्याचार सहन करतात. बऱ्याच खाजगी कंपन्या मध्ये पगारवाढ, प्रमोशन साठी ही महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे समोर आले आहेत. एवढेच काय तरुण आणी अविवाहित असताना मनमोकळेपणाने जगता यावे, आपल्या भावना कोणाला तरी सांगता याव्यात म्हणुन केलेल्या मैत्रीमध्ये ही तरुणींना लैंगिक सुखाची इच्छा पुर्ण करावी लागते. आज प्रेम म्हणजे दुसरे तिसरे काही नसुन लैंगिक सुखाची सोय अशीच व्याख्या झाली आहे. लैंगिक सुखावरून किंवा वागण्यावरून शुल्लक कारणांमुळे वाद होऊन, लग्नाच्या आमिष्याच्या नावाखाली कित्येक तरूणीची लैंगिक छळासह हत्या झाल्याच्या घटना दररोज घडत आहेत. नराथम स्वतः ची भुक भागवण्यासाठी मुली महिला यांना मंदिरात नेऊन अत्याचार करतात तर कधीकधी मंदिरातील पुजारीच मंदिरातच अत्याचार करून स्वतःला धार्मिक मानतो. विरंगुळा आणि मनाच्या प्रसन्नतेसाठी फिरायला गेलेल्या महिलेवंरही लैंगिक अत्याचार व्हावेत अशा लाजिरवाण्या गोष्टी घडत आहेत. किर्तनात बसल्यावर किर्तनकार अक्षरशः

अश्लील भाषेत महिलांवर बोलतो आणि किर्तन संपल्यावर किर्तनकारच अत्याचार करतो ह्या पण घटना काही कमी नाहीत. भोंदु लोकांचा तर उत आला आहे. घरात

शांती व समृद्धी साठी भोंदु लोक पैसा आणि महिला दोन्ही चा वापर करतात आणि हे सुशिक्षित वर्गामध्ये जास्त आहे हे विशेष. अनेक नावाजलेले महाराज लोक लैंगिक शोषणाच्या गुन्ह्याखाली तुरुंगात आहेत आणि माणसिक मनोरुग्ण ते निर्दोष असल्याचे डिंडोरा पिटतात तो भाग वेगळा. सर्वात महत्वाचे म्हणजे ज्याचा सोबत आयुष्य काढायचे तो ही व्यक्ती बायको ला केवळ उपभोगाचे साधन समजून त्याला वाटेल तेव्हा पत्नीचा विचार न करता वापर करत असेल तर हा सुद्धां लैंगिक अत्याचारच आहे. आज जर आपण विचार केला आईचे पोट, परिसर, आळखिचे लोक, शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक ठिकाण, मंदिर, पर्यटन स्थळे येथे कुठेच महिला सुरक्षित नाहीत तरीही यावर पाहिजे तशी चर्चा होत नाही. थांबण्यासाठी उपाययोजना होत नाही. दररोज बलात्कार व हत्या प्रकरण होत आहेत पण सर्वजन एकदम शांत असतो. परंतु एखाद्या वेळी श्रीमंत आणि उच्च वर्णीय घरातील मुलींवर अत्याचार झाला की मेणबत्त्या घेऊन आंदोलने केली जातात. अर्थात गुन्हेगार पैसा किंवा जात बघून अत्याचार करत नाही म्हणून आपणही मेणबत्ती जात किंवा पैसा बघून हातात घेतली नाही तर मुलींना सुरक्षित वाटेल. अत्याचार फक्त भारतीय महिलांवर भारतात होतात असे नाही. पर्यटक म्हणून आलेल्या विदेशी महिलांवर बलात्कार, विदेशी महिलांचा विनयभंग ह्या ही गोष्टी कमीत नाहीत. देशातील वाढते महिला लैंगिक अत्याचार प्रकरणे बघून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणतात भारतात जाण्यापूर्वी विचार करावा कारण तेथे महिला सुरक्षित नाहीत. एवढ्या लाजिरवाण्या बाबी घडत असताना सरकार व सरकारचे अंधभक्त आणि स्ट्रीम मिडिया विषेशतः इलेक्ट्रॉनिक्स मिडीया जनतेचा आवाज बनून उभे राहायला पाहिजे तर मिडिया राजकीय पक्षाचा प्रवक्ता म्हणून गुलामी आणि लाचारी करत आहेत म्हणून भारतीय मिडीयाचा जागतिक स्थरावर कसा डंका वाजत आहे हे सांगण्याची गरज नाही. सरकार महिलांना सुरक्षा का देऊ शकत नाही तर सरकारमध्ये असलेल्या पक्षाचे नेते कार्यकर्ते हेच हॉटेल, हायवेवर व इतर ठिकाणी महिलांचे शोषण केल्याचे व्हिडीओ व्हायरल होतात, अनेक नेते कार्यकर्ते हे राजकीय आमिष दाखवून महिलांचे लैंगिक शोषण करतात. सत्तेतील कितीतरी जनतेच्या नोकरांवर बलात्कार, विनयभंग सारखे आरोप असताना ते जर सत्तेमध्ये असतील तर तर महिलांना सुरक्षा कोण देणार? प्रत्येक गोष्टीमध्ये धर्म आणुन जोरजोरात ओरडणारा मिडिया आरोपी मुस्लिम असेल तर प्रकरण ताणून घेऊन धार्मिक द्वेष पसरवून चुकिची माहिती देते. आरोपी मुस्लिम असला तरच मिडीयाला महिला अत्याचार दिसतात नाहीतर सत्तेतील नराधामांविरोधात महिला खेळाडू यांनी आंदोलन केले, व्हिडीओ व्हायरल झाले तरीही चँनलवाले महिला संदर्भात एकही शब्द सरकारला विचारणार नाहीत हिच मिडीयाची गुलामी सिद्ध होते. पण प्रश्न अजूनही कायम असतो. लैंगिक अत्याचार झालेल्या मुली कोणत्या धर्मच्या? आणि कोणत्या वयच्या स्त्रीया कोणत्या ठिकाणी सुरक्षित आहेत?

**– विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# सोलापूर जिल्ह्याची सर्वांगीण विकासाकडे वाटचाल...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात जिल्हा नियोजन समितीची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. नियोजन समिती मार्फत प्रत्येक वर्षी जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणांना विविध शासकीय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ७०० ते ९०० कोटीचा निधी देण्यात येतो. प्रत्यक्ष शासकीय विभागाकडून या प्राप्त झालेल्या निधीतून विकासात्मक कामे करण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळवून दिला जातो. पालकमंत्री जयकुमार गोरे हे समितीचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे समिती सचिव म्हणून नियोजनबद्ध विकास कार्यक्रम राबवून सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहेत.

**जिल्ह्यात एकाच वर्षात ६२ हजार घरकुले मंजूर–**

आपल्या देशाचे मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सर्वांसाठी घर हे स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याला २० लाख घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त करून घेतले आहे. सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना टप्पा १ मध्ये मागील सात वर्षात ४३ हजार ९९० घरकुले मंजूर होती त्यापैकी ४० हजार १९० घरकुले पूर्ण झालेले आहेत. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा– २ सुरू झालेला असून चालू एकाच आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजनेतून ६२ हजार ९५० घरकुले मंजूर केलेली आहेत.

साहित्याच्या वाढत्या किमतीमुळे घरकुल लाभार्थ्यांना निधीची कमतरता भासत होती अशा वेळेस मुख्यमंत्री महोदयांच्या प्रयत्नाने घरकुल लाभार्थ्यांना राज्य हिस्स्यामधून ५० हजार रुपयांची अतिरिक्त वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ३५ हजार रुपये घरकुल बांधकामासाठी व १५ हजार रुपये प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसाठी अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यातील बेघर लाभार्थ्यांच्या आवास प्लस २०२४ चे सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. यास्तव ग्राम पातळीवर आवश्यक ती प्रचार प्रसिद्धी करून जिल्ह्यातील एकही बेघर लाभार्थी सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.



**जिल्हा प्रशासनाच्या वतीने भूमिहीन नागरिकांना जमीन वाटप –**

प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्रामीण भागातील भूमिहीन नागरिकांना एक रुपये प्रति चौरस फुट दराने जागा देण्यात येणार असून २५ मे २०२५ पासून ग्राम पंचायतीच्या वतीने जमीन वाटपाची प्रक्रिया सुरू होणार आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सुमारे दोन हजार भूमिहीनांना घरासाठी जमीन उपलब्ध होणार आहे. तत्पूर्वीच जिल्हा प्रशासनाने शासकीय जमीन, अतिक्रमण झालेली जमीन व गायरान जमीन आदींची यादी बनवून लॅन्ड बँक तयार केलेली आहे.

**जिल्ह्यात १०० दिवसाच्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी –**

मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेप्रमाणे १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत जिल्हा प्रशासनाने सात कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी केलेली आहे. या आराखड्याचा दुसरा टप्पा अंतर्गत सर्व प्रशासकीय यंत्रणांनी केलेल्या कामाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी लवकरच सुरू होत आहे. परंतु प्रशासनाने शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतरही याच पद्धतीने लोकांना उत्कृष्टपणे सेवा दिल्या गेल्या पाहिजेत.

**यावर्षी जिल्ह्याला ९३४ कोटीचा निधी मंजूर –**

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात ७०२ कोटी निधी मंजूर होता. या सर्व निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची कामे घेण्यात आलेली असून जवळपास ९९.७४ टक्के निधी खर्च झाला आहे. तर जिल्हा वार्षिक योजना सन २०२५ – २६ अंतर्गत सोलापूर जिल्ह्याला ९३४ कोटी २८ लाखाचा निधी मंजूर आहे. यातून ही सर्व शासकीय यंत्रणांना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची कामे प्रस्तावित करणार आहेत.

**जिल्ह्याला खरीप हंगामाची नुकसान भरपाई रक्कम २१६ कोटी मिळाली –**

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२३ मधील ३ लाख ८५ हजार शेतकऱ्यांना २१६ कोटी तसेच रब्बी हंगाम २०२३ मधील ४० हजार शेतकऱ्यांना २२ कोटी पिक विमा नुकसान भरपाई निधी वितरित करण्यात आलेला आहे. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत फळ उत्पादनात सोलापूर जिल्ह्याचे काम चांगले असून आपला जिल्हा केळी निर्यातीत प्रथम क्रमांकावर असून लवकरच उत्पादनातही आघाडी घेईल.

**लखपती दीदी योजनेत ४७३ कोटीचे कर्ज वितरण –**

लखपती दीदी योजनेत सोलापूर जिल्ह्याला १ लाख १९ हजाराचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते, त्यानुसार १ लाख २५ हजार लखपती दिदी जिल्ह्यात झालेल्या असून उद्दिष्टापेक्षा अधिक काम झालेले आहे. या महिलांना लखपती करण्यासाठी ४५३ कोटी रुपयांचे बँक कर्ज वितरित करण्यात आलेले आहे.

जिल्ह्यातील बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी उमेद मॉल उभारण्यात येणार आहे, त्यासाठी राज्य शासनाने २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली आहे.

**महिला बचत गटांना मिळाली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ –**

उमेद अंतर्गत पंढरपूर येथील शिवस्वराज्य महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या महिला शेतकरी सदस्यांनी पिकवलेला २ टन शेवगा दुबई येथे निर्यात केला तर माढा येथील माढेश्वरी महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या महिला शेतकऱ्यांनी ९ टन पेरू सौदी अरेबिया येथे निर्यात केला. स्थानिक बाजारपेठेपेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या महिला सदस्यांच्या शेतमालाला दुप्पट बाजार भाव मिळाला आहे.

**मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना–**

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील ८०० ज्येष्ठ नागरिकांचे ११ ते १६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ओरिसा येथील श्री जगन्नाथ पुरी चे दर्शन घडवून आणलेले आहे.

**भू प्रणाम केंद्र ही सुविधा –**

भूमि अभिलेख विभागाकडून नागरिकांच्या सोयी करीता सोलापूर येथे नगर भूमापन अधिकारी कार्यालय येथे भू प्रणाम केंद्र ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. सेतु सुविधा केंद्राच्या धर्तीवर ही सुविधा देण्यात येत आहे. तरी नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

जिल्ह्यातील गरजू रुग्णांना आरोग्य योजनाचा लाभ – महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत जिल्ह्यात ११ लाख ५२ हजार गोल्डन कार्ड तयार करण्यात आली आहेत. या लाभार्थ्यांना प्रतिवर्षी प्रति कुटुंब ५ लाख रुपये पर्यंतचे विमा कवच उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या योजनेचे जिल्ह्यात ८६ तर जिल्हा बाहेरील अंगीकृत रुग्णालयामध्ये आरोग्य सेवा दिली जात आहे.

**जलयुक्त शिवार अभियान २.० :–**

या अंतर्गत जिल्ह्यातील १६५ गावांची निवड करण्यात आलेली आहे. या सर्व गावामध्ये विविध यंत्रणांकडून जलसंधारणाची कामे प्रस्तावित करून ही गावे जलयुक्त केली जाणार आहेत. या गावातील ३ हजार ५७२ कामांसाठी ९५ कोटी १४ लाखाचा निधी मंजूर करण्यात आलेला असून शासनाकडून ८.५० कोटी निधी प्राप्त झालेला आहे. तर या अभियान अंतर्गत मार्च २०२५ अखेर ९ कोटी ९६ लाखाची १११ पूर्ण केली जाणार आहेत.

**गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार:–**

या योजनेअंतर्गत सन २०२३–२४ व २४–२५ मध्ये एकूण १२५ जलसाठ्या मधून ८७.३५ लाख घनमीटर इतका गाळ काढून अडीच हजार हेक्टर क्षेत्रावर शेतकऱ्यांनी टाकला आहे. गाळ काढल्यामुळे साधारणतः ८७३.५० कोटी लिटर इतका पाणीसाठा वाढलेला आहे. शेतात गाळ टाकल्याने व सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात भरघोस वाढ होऊन या योजनेचा लाभ त्यांना मिळत असल्याने शेतकरी बांधव ही समाधानी आहेत.

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ :–**

या महामंडळाच्या माध्यमातून राज्यभरात एक लाख मराठा उद्योजक बनवण्याचे संकल्प पूर्ती झालेली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ११ हजार ९०० लाभार्थ्यांचा समावेश आहे. हे महामंडळ मराठा तरुणांना उद्योग व्यवसाय विषयी मार्गदर्शन करून स्वतःच्या उद्योग उभा करण्यासाठी बँकांच्या माध्यमातून कर्ज उभारणी व त्यावरील व्याजाचा परतावा देते. आज रोजी पर्यंत जिल्ह्यातील लाभार्थ्यांना ९१ कोटीचा व्याज परतावा महामंडळाकडून देण्यात आलेला आहे. तसेच महामंडळ जिल्ह्यातील जास्तीत जास्त मराठा तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी कटीबद्ध आहे.

**एकात्मिक पर्यटन विकास आराखडा:–**

सोलापूर जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूरक उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शक्य आहे. यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला वेग येईल, तसेच येथून होणारे स्थलांतर ही थांबण्यास मदत होणार आहे. राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी एकूण २८२.७५ कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. या अंतर्गत उजनी जल पर्यटन १९० कोटी १९ लाख, कृषी पर्यटन १९ कोटी ३० लाख, विनयार्ड पर्यटन ४८ कोटी २६ लाख, धार्मिक पर्यटन २५ कोटी निधी मंजूर आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला खूप मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे.

**पंढरपूर विकास आराखडा –**

श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक दरवर्षी येत असतात. परंतु भाविकांना दर्शनासाठी खूप वेळ दर्शन रांगेत उभे राहावे लागते त्यामुळे दर्शन मंडप व दर्शन रांग याकरिता १२९.४० कोटीचा आराखडा शासनाने मंजूर केला असून ही कामे लवकरच सुरू होणार आहेत. पंढरपूर देवस्थान मंदिर विकासाकरिता ७३.८५ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून या अंतर्गत ५५.४६ कोटीच्या रकमेची तीन कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून यावर जवळपास १५ कोटीचा निधी खर्च झालेला आहे उर्वरित सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. दर्शन मंडप, दर्शन रांग व मंदिरातील अन्य कामे वेळेत पूर्ण करून भाविकांना सहज व सुलभ दर्शन मिळणार आहे.

**विमानसेवा –**

नूतनीकरण झालेल्या सोलापूर विमानतळाचे माहे नोव्हेंबर २०२४ रोजी देशाचे माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथून दूरदृश्य प्रणाली द्वारे लोकार्पण झाले. सोलापूर जिल्हा विमान वाहतुकीने जोडला गेल्यामुळे येथील उद्योग व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. त्यामुळे राज्य शासन व विमानतळ प्राधिकरण सोलापूर विमानतळ येथून विमान सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्नशील असून साधारणपणे ९ जून २०२५ पासून सोलापूर ते गोवा विमानसेवा सुरू होण्याची शक्यता आहे.

याप्रकारे सोलापूर जिल्ह्यात विविध विकासकामे केली जात असून केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ ही संबंधित विभागाकडून दिला जातो. शासन व प्रशासन परस्परात समन्वय ठेवून काम करत आहे.

**– सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**सोलापूर**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Daydev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# संविधान उद्देशिका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण

## केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉच्या परिसरात संविधान उद्देशिका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक मूल्य आणि भारतीय शाश्वत मूल्य यांची उत्तम सांगड घालत भारतीय संविधानाची निर्मिती केली असून उद्देशिका हा संविधानाचा गाभा आहे. उद्देशिकेतील मूल्यांचा अंगीकार देशातील नागरिकांनी करावा त्यामुळे देशातील ९० टक्के प्रश्न कायमचे सुटतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात भारतीय संविधानाचे धडे गिरविले व संविधानिक मूल्य कृतीत आणले त्याच महाविद्यालयात संविधान उद्देशिका पार्क आणि त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होत आहे ही महत्त्वाची व समाधानाची बाब आहे. संविधानातील मूल्यांवर चालत भारताने जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचा मान मिळविला आहे.

उद्देशिका संविधानाचा गाभा आहे. यातील निहीत मूल्यांचा सर्व नागरिकांनी अंगिकार करणे गरजेचे आहे. याची प्रेरणा येथे भेट देण्याऱ्या प्रत्येकाला मिळेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाची नवीन इमारत बांधण्यात येईल व या पार्कला आवश्यक सर्व सोयी -सुविधा पुरविण्यात येतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, माजी मंत्री नितीन राऊत, माजी खासदार जोगेंद्र कवाडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रमुख सचिव हर्षदीप कांबळे, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे, संविधान उद्देशिका पार्क समितीचे अध्यक्ष गिरीष गांधी आदी उपस्थित होते.




# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'प्रथम वर्ष इंजिनिअरिंग (पदवी) च्या प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया आजपासून अर्थात शनिवार, दि.२८ जून २०२५ पासून सुरु झाली असून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला स्क्रुटीनिटी सेंटर (एस.सी. ६२२०) म्हणून मान्यताही मिळालेली आहे. ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया बुधवार, दि.८ जुलै २०२५ (सायं. ५.००) पर्यंत चालणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

### स्वेरीत ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध

महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, मूळ कागदपत्रे अपलोड करणे आदी बाबींचा समावेश आहे. पदवी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठीची ही प्रक्रिया शनिवार, दि.२८ जून २०२५ पासून ते बुधवार, दि.८ जुलै २०२५ (सायं. ५.००) पर्यंत चालेल तर कागदपत्रे पडताळणी करून खात्री करणे यासाठी सोमवार, दि.३० जुन २०२५ पासून ते गुरुवार, दि.९ जुलै २०२५ (सायं.५.००) पर्यंत मुदत दिली आहे. रजिस्ट्रेशनसाठी येताना विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्गानुसार असलेली सर्व मूळ कागदपत्रे घेऊन यावीत तसेच स्वतःचा मोबाइल/नंबर सोबत असावा. 'सदरची नोंदणी यशस्वीपणे आणि बिनचूकपणे केलेले विद्यार्थीच शासनाच्या कॅप राऊंडसाठी पात्र राहतील. सदर कॅप राऊंड मधून प्रवेशित विद्यार्थीच शासनाच्या वेगवेगळ्या सवलती घेण्यास पात्र राहतील. त्यामुळे ही प्रवेश नोंदणी प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असून सर्व विद्यार्थी व पालकांनी स्वेरीत येऊन ही प्रक्रिया येथील तज्ञ शिक्षकांमार्फत पूर्ण करून घ्यावी.' असे आवाहन प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील यांनी केले आहे. अभियांत्रिकीच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी अधिष्ठाता डॉ.करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा. यु.एल.अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर कर्मवीर औदुंबर रावजी पाटील २५ वी जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २८ रोजी पंढरपूर तालुक्यातील वेनूनगर गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन व माजी आमदार स्वर्गीय औदुंबर अण्णा पाटील यांची पंचविसावी पुण्यतिथी शनिवार दिनांक २८ जून २०२५ सकाळी साडेनऊ वाजता कारखाना स्थळावर साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कारखाना कार्यस्थळावरील कर्मवीर स्वर्गीय औदुंबर अण्णा पाटील यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे विधी व पूजन कारखान्याची चेअरमन, आमदार( आबा) पाटील व सोयरीचे संस्थापक सचिव श्री बी.पी. रोंगे सर संचालक श्री सचिन सोपान वाघाटे यांच्या शुभहस्ते व संचालक मंडळाच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता रोंगे, संचालक सर्वश्री दिनकर दाजी चव्हाण, संभाजी भोसले, धनंजय काळे , कालिदास साळुंखे, प्रवीण कोळेकर, सिद्धेश्वर बंडगर, महेश खटके, विठ्ठल रणदिवे, तज्ञ संचालक सर्वश्री दशरथ जाधव, अशोक तोंडले, अशोक घाडगे, कारखान्याचे कार्यकारी संचालक बी .आर. पाटील, जनरल मॅनेजर डी.आर. गायकवाड, तसेच अधिकारी कर्मचारी, कार्यकर्ते, सभासद व्यापारी हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी उपस्थित सर्व संचालक व मान्यवरांनी स्वर्गीय औदुंबर पाटील यांना अभिवादन करून श्रद्धांजली वाहिली.

# पंढरपूर शहरातील अतिधोकादायक इमारती, मठात वास्तव्यस प्रतिबंध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न होत आहे. आषाढी यात्रा सोहळयासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरपूरला येतात. त्यासोबत लाखो भाविक पंढरपूर पालखीसोहळासोबत येतात. सदर भाविकांची यात्रा सुलभ व सुरक्षितपणे पार पडणे, यावर प्रशासनाकडून प्रथम प्राधान्या दिले आहे. अतिधोकादायक इमारती, मठ दि. २९ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वापर करणेस तसेच त्याठिकाणी वास्तव्य करणेस प्रतिबंध करणेत येत असुन याबाबतचे आदेश उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी जारी केले आहेत.

पंढरपूर शहरात यात्रा सोहळयासाठी विविध भागातून येणारे भाविक/वारकरी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील मठ, वाडे, इमारती आदी ठिकाणी वास्तव्य करतात. त्यापैकी काही इमारती, मठ बंद व जुने आहेत. यात्रा कालावधीत भाविक त्या ठिकाणी वास्तव्यास राहतात. बंद असलेले तसेच जुन्या इमारती व मठ यांचे कोणत्याही प्रकारचे परीक्षण झालेले नाही.

मानवी जीवितास धोका होवू शकतो. यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील धोकादायक इमारती, मठ यांचेपासून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच भाविकांच्या जीवितास धोका निर्माण होवू नये, यासाठी प्रतिबंधात्मक आदेश पारीत करण्यात आले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) मला प्राप्त अधिकाराचा वापर करून,उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी सदर आदेश जारी केले आहेत.

# शिक्षण विभागाकडून सन्मान समारंभः शिक्षकांनी काळानुरूप तंत्रज्ञानाचा अवलंब करावा; आमदार सचिन कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : आज सर्व क्षेत्रात तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला आहे. शिक्षण क्षेत्रातही एआय तंत्रज्ञानाचा प्रसार होत असताना, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी शिक्षकांशी संवाद साधला आणि शिक्षकांनी काळानुरूप तंत्रज्ञानाचा अवलंब करावा आणि शिक्षण क्षेत्रात आणखी सुधारणा कराव्यात असे सांगितले.

पंचायत समिती शिक्षण विभागाने शनिवारी येथील यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात आयोजित केलेल्या आणि जिल्हा परिषदेच्या आणि खाजगी शाळांना मुख्यमंत्री सुंदर शाळा पुरस्कार प्रदान करण्याच्या कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की, आजचा युग माहिती आणि तंत्रज्ञानाचा युग आहे. तंत्रज्ञानाचा समावेश करून, शिक्षकांनी समाजाशी चांगला संपर्क राखावा आणि तालुक्यातील मुलांची गुणवत्ता सुधारण्यात स्वतःला गुंतवून घ्यावे आणि तालुक्यातील शैक्षणिक पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत.



समारंभात, आमदारांनी २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षात 'मुख्यमंत्री सुंदरा शाळा' उपक्रमांतर्गत तालुक्यातील पुरस्कार प्राप्त केलेल्या ६ जिल्हा परिषद प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या शाळा आणि ६ खाजगी शाळांचा सन्मान पत्र देवून सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

वर्षात निवृत्त झालेल्या विस्ताराधिकारी अधिकारी, ४ केंद्रप्रमुख, ८ मुख्याध्यापक आणि २२ शिक्षकांचा सन्मान केला. यावेळी, आमदारांनी शिक्षकांसाठी नव्याने विकसित केलेल्या ऑनलाइन वेतन वेबसाइटचे उद्घाटन (लाँच) केले.

यावेळी बीडीओ शंकर कविताके, सहाय्यक बीडीओ विजय विभुते, गट शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, विस्ताराधिकारी सोमशेकर स्वामी व लक्कप्पा पुजारी यांच्यासह तालुक्यातील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका कल्पना स्वामी, निशिगंधा कोळी, रविकिरण कोळी, व विकास तळवार उपस्थित होते.

### पंढरपुर शहरातुन मोटारसायकली चोरी करणाऱ्या आरोपींना अटक; पाच लाख ६८ हजार रुपये किंमतीच्या ९ मोटारसायकली जप्त

# पंढरपुर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची धडाकेबाज कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत पंढरपुर शहरात मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेचे उद्देशाने मा. पोलीस अधिक्षक, श्री. अतुल कुलकर्णी सो।, मा.अपर पोलीस अधिक्षक, श्री. प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.डॉ. अर्जुन भोसले, पंढरपूर उपविभाग पंढरपुर यांचे सुचनेनुसार व पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची विशेष पथके नेमुन पंढरपुर शहर व परिसरातील ज्या ठिकाणी मोटार सायकल



चोरी जाणेचे प्रमाण जास्त आहे त्या ठिकाणचे घटनास्थळ निरीक्षण करून व त्यावर बारकाईने लक्ष ठेवुन गोपनीय बातमीदार यांचे मार्फतीने मोटार सायकली चोरीबाबतची माहिती काढणेचे काम सुरू असताना गोपनिय बातमीदाराकडुन एक बातमी मिळाली की, पंढरपुर शहरामध्ये बाहेर गावावरून काही आरोपी चोरी करण्या करीता येत आहेत त्यांची नावे १) गणेश बाळासो। जाधव रा. जाधववाडी ता. माळशिरस जि. सोलापुर २) विकास महादेव पवार रा. न्हावीरूई ता. इंदापुर जि. पुणे सध्या वाडी नं. २ माळशिरस जि सोलापुर ३) सुरज लाला पवार रा. वालचंदनगर रोड कळंब ता. इंदापुर ४) अतुल बाळु तुपे रा. इंदिरा नगर कळंब ता. इंदापुर जि. पुणे ५) ओंकार अनंद वाघमोडे रा. ६१ फाटा माळशिरस जि. सोलापुर असे नावे कळाले वरून सदर आरोपी यांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी एकुण ०८ गुन्हयाची कबुली दिली आहे. सदर आरोपींकडुन गुन्ह्याचा कौशल्यपुर्ण सखोल तपास केला असता आरोपींनी पंढरपुर शहर पोलीस ठाणेस दाखल असलेले भाग ५ गुरनं १) गुरनं ४७८/२०२४ भा.न्या. सं. २०२३ चे कलम ३०३(२), २) गुरनं २३/२०२५ भा.न्या. सं.२०२३ चे कलम ३०३ (२), ३) गुरनं २५/२०२५ भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३०३(२), ४) गुरनं ३१३/२०२५ भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे, ५) गुरनं ४१८/२०२५ भा. न्या.सं.२०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे, ६) गुरनं ४२०/२०२५ भा.न्या.सं. २०२३ चे कलम ३०३(२), ७) गुरनं ४२१/२०२५ भा. न्या. सं.२०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे ८) गुरनं ४२१/२०२५ भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे पंढरपुर शहर पोलीस ठाणे येथे दाखल असलेले गुन्हे केल्याचे कबूली दिली आहे.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री.डॉ. अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर पोलीस ठाणे श्री. विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री आशिष कांबळे, पोह ३६४ पाटील, पोह ३९८ सिरमा गोडसे, पोह २२१ प्रसाद औटी, पोह १७८९ सचिन हेंबाडे, पोह १२५५ विठ्ठल विभुते, पोका ३१ कपिल माने, पोकों १९०४ निलेश कांबळे, पोशि १२१६ शहाजी मंडले, पोशि २१९० समाधान माने, पोकों १५१३ बजरंग बिचुकले, पोकॉ १३०४ दिपक नवले, पोकॉ ८०१ धनाजी मुटकुळे तसेच सायबर शाखा सोलापुर ग्रामीण चे पोकॉ ११८२ रतन जाधव यांनी केली आहे.

# आषाढी वारी : मुखदर्शनरांगेत छत्रपती संभाजी चौक येथे सरकता उड्डाणपुल

## प्रदक्षिणा मार्गावरील रहदारीचा अडथळ दुरू होणार, मुखदर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यास होणार मदत : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रेच्या सोहळ्याला सुरवात झाली असून, वारकरी भाविकांनी मंदिर परिसरात व दर्शनरांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. या यात्रेचा मुख्य सोहळा रविवार दि. ०६ जुलै रोजी संपन्न होत आहे. त्यासाठी श्रींच्या पदस्पर्शदर्शनरांगेत व मुखदर्शनरांगेत बॅरीकेटींग करण्यात आलेले आहेत. तथापि, श्रींच्या मुखदर्शन रांगेत छत्रपती संभाजी चौक येथे कार्तिकी यात्रेप्रमाणे प्रदक्षिणा मार्गावरील रहदारीचा अडथळा लक्षात घेऊन सरकता उड्डाणपुल उभारण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची मुखदर्शनरांग श्री संत तुकाराम भवनच्या पाठीमागून छत्रपती संभाजी चौक पर्यंत असते. तथापि, छत्रपती संभाजी चौक येथे उड्डाणपुल नसल्याने दर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यास तसेच प्रदक्षिणा मार्गावरील वारकरी भाविकांना मोठा अडथळा निर्माण होत होता. तसेच स्थानिक रहिवाशी व दुकानदारांच्या देखील तक्रारी प्राप्त होत होत्या.

सदरचा उड्डाणपुल ३० फुट लांबी व १० फुट उंचीचा असून, यामधील १२ फुटाचा भाग सरकता असल्याने, एकादशी दिवशी प्रदक्षिणा मार्गावर येणा-या रथांना कोणताही अडथळा होणार नाही, १० फुटांपेक्षा जास्त उंचीचा रथ आल्यानंतर अत्यंत कमीतकमी वेळेत पुलाचा वरील भाग सरकवून रथ पार करता येणार आहे. सदर उड्डाणपूल तांत्रिकदृष्ट्या योग्य व सक्षम असल्याबाबत यांत्रिकी कार्यशाळेचे प्रमाणपत्र देखील घेण्यात आले आहे. या उड्डाणपुलामुळे श्रींची दर्शनरांग द्रुतगतीने चालून भाविकांना जलद व सुलभ मुखदर्शन होणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# आ.काळे यांची शिवमहापुराण कथेला भेट, वैजापूर येथे शिव महापुराण कथेला भाविकांची तुफान गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वैजापूर (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे श्री साईभक्त बहूउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित परम पूज्य पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेला आमदार. आशुतोषदादा काळे उपस्थित राहिले असून परम पूज्य पंडित प्रदीपजी मिश्रा यांचे आशीर्वाद घेऊन त्यांच्या अमृतवाणीतुन शिवमहापुराण कथेचा लाभ घेतला





यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेबजी दानवे, साईभक्त बहूउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विशालजी संचेती, प्रमोदजी जगताप, महानंदाचे माजी संचालक राजेंद्र जाधव, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकरजी रोहोम, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, आयोजक कमिटीचे सदस्य आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध दारु साठ्यावर पंढरपूर तालुका पोलिसांची धडाकेबाज कारवाई

दीड लाख रुपयांच्या अवैध ३० बॉक्स दारू पंढरपूर तालुका पोलिसांनी केला जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आज दिनांक २९ जून २०२५ रोजी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पंढरपूर ते कुर्डूवाडी जाणारी रोडवर हॉटेल शुभेच्छा पाठीमागे असलेले पत्राशेड खोलीमध्ये मौजे भटुंबरे येथे या गावाचे शिवारातील इसम नामे सतीश रामा वसेकर वय ४१ वर्ष रा. नारायण चिंचोली तालुका पंढरपूर याचे वस्तीतील घरामध्ये अवैधरित्या दारू विक्रीसाठी देशी विदेशी दारूचा साठा असल्या बाबतची खात्रीशीर माहिती पंढरपूर तालुका पोलिसांना मिळाल्या नंतर पंढरपूर तालुका पोलिसांनी तात्काळ माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर श्री अर्जुन भोसले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी पोलिस अधिकारी स्टाफसह छापा मारून एकूण १,५०,६७२/- रुपये किमतीचा मुद्देमाल मौजे भटुंबरे गावचे शिवारामध्ये मॅकडोनाल्ड व इतर कंपनीच्या वेगवेगळ्या कंपनीच्या दारूच्या एकूण ३० बॉक्स देशी-विदेशी दारू त्याची किंमत एकूण रुपये १,५०,६७२/- रुपये किमतीचा दारूच साठा अवैध विक्री करण्यासाठी बाळगलेल्या अवस्थेत मिळून आल्याने सर्व दारूचा साठा पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून इसमनामेसतीश रामा वसेकर वय ४१ वर्ष रा. नारायण चिंचोली तालुका पंढरपूर याचे विरुद्ध मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक साहेब श्री अतुल कुलकर्णी माननीय अपर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर साहेब माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर अर्जुन भोसले साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पीएसआय भारत भोसले सहाय्यक फौजदार दत्तात्रय तोंडले पोलीस हेडकॉन्स्टेबल मंगेश रोकडे गजानन माळी सुधीर शिंदे सुहास देशमुख पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी महिला पोलीस हवालदार मनेरी मॅडम पोलीस कॉन्स्टेबल महेश गोडसे पोलीस होमगार्ड सुनील कवडे यांच्या पथकाने सदरची कारवाई केली आहे.

# वैनतेय विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सध्याच्या नवीन युगाला तंत्रज्ञानाला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी आपलं ज्ञान अपडेट केलं पाहिजे परीक्षांमध्ये येणाऱ्या अपयशाने खचू नका अपयश ही यशाची पुढची मोठी पायरी असते शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि मनोबल वाढवल पाहिजे त्याच्या प्रगतीला बळ देण्याचे काम शिक्षकांनी केलं पाहिजे असे प्रतिपादन कवी व ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मण महाडिक यांनी केले.




निफाड येथील न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय विद्यालयातील १० वी आणि १२ वीतील तसेच दावचवाडी येथील योगेश्वर विद्यालयातील १० वी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा निफाड येथील वैनतेय विद्यालयात आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी बोलताना कवी लक्ष्मण महाडिक यांनी वरील प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे होते तर प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, अँड दिलीप वाघवकर, विश्वास कराड ,वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी. आर. सोनवणे, उपप्राचार्या मनीषा गुजराथी ,पर्यवेक्षक गुलाब टकले ,पर्यवेक्षक बी. बी .गुंजाळ , वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य पल्लवी सानप, प्रभारी मुख्याध्यापक सुनील मोगल, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे ,मुख्याध्यापिका प्रसन्ना कुलकर्णी,आदी मान्यवर उपस्थित होते प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य बी आर सोनवणे यांनी केले प्रमुख अतिथींचा परिचय रशीद पठाण यांनी करून दिला. याप्रसंगी लक्ष्मण महाडिक ,वि. दा.व्यवहारे यांची भाषणे झाले. लक्ष्मण महाडिक यांनी भाषण करताना काही कविता उपस्थित विद्यार्थ्यांना ऐकवल्या. याप्रसंगी सुधाकर कापसे ,गोरख सानप ,मकरंद मोगल यांच्यासह पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कांचन सानप यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्या मनीषा गुजराथी यांनी केले.

# राष्ट्रीय निबंध स्पर्धेत पांगरा शाळेची श्वेता शिंदे तृतीय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पांगरा/प्रतिनिधी : भारतीय इतिहास संकलन समिती महाराष्ट्र प्रांत यांच्यातर्फे डॉ.आनंदी गोपाळ जोशी स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.या राष्ट्रीय निबंध स्पर्धेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पांगरा शिंदे या शाळेची विद्यार्थिनी कु.श्वेता संजय शिंदे हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

डॉ.आनंदी गोपाळ जोशी यांच्या जीवनावर आधारित आयोजित करण्यात आलेली ही राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांपासून ते पदवीधर व वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यासाठी विविध विषयानुसार होती. या निबंध स्पर्धेत जि.प.कें.प्रा.शा.येथील शिक्षक श्री यादव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.नुकताच या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला व निकालामध्ये पांगरा शाळेची विद्यार्थिनी कु.श्वेता संजय शिंदे हिने तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळविले.ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या श्वेताने राष्ट्रीय पातळीच्या स्पर्धेत यश प्राप्त करून आपल्या शाळेचे , गावाचे नाव राष्ट्रीय पातळीवर नेल्याबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कु.श्वेता शिंदे च्या व जिल्हा परिषद पांगरा शाळेच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री त्र्यंबक शिंदे सर तसेच शिक्षक श्री कदम सर,श्री गायकवाड सर,श्री कोल्हे सर,श्री थोटे सर,श्री मुळे सर,श्री खिल्लारे सर,श्री गुज्जलवार सर,श्री इंगोले सर,श्रीमती भेडे मॅडम,श्रीमती दुधमल मॅडम ,श्री सतीश भोसले सर, विलास भोसले सर,इंगोले सर,शा.व्य. अध्यक्ष व समिती सदस्य यांनी अभिनंदन केले.



# उल्हासनगर तालुका शाखेच्या वतीने समता सैनिक मेळावा संपन्न

उल्हासनगर /बाळासाहेब अहिरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर - ३ मध्ये सुभाष नगर पंचशील बुध्द विहारात शनिवार दि २८ जून २०२५ रोजी भारतीय बौध्द महासभा. उल्हासनगर तालुका शाखेच्या वतीने समता सैनिक दल मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष रोशन पगारे होते तसेच या समता सैनिक दल मेळाव्याचे उद्घाटन भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड गुरुजी, यांच्या हस्ते झाले तसेच या समता सैनिक दलाचे ऐतिहासिक कार्या या विषयावर भारतीय बौध्द महासभा. समता सैनिक दलाचे लेफ्टनंट जनरल हेडक्वार्टर सचिव डि एम आचार्य सर, हे समता सैनिक दलाच्या मेळाव्यात मार्गदर्शन करीत होते तसेच राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड गुरुजी यांनी बोलताना सांगितले समता सैनिक कसा असावा. भारतीय बौध्द महासभेच्या राष्ट्रीय संरक्षक ममतासागर महाउपासिका मीराताई आंबेडकर या आमच्यासाठी बौध्दाच्या राष्ट्रपती आहेत असे उदगार भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड गुरुजी हे उल्हासनगरात समता सैनिक दलाच्या मेळाव्यात मार्गदर्शन करीत होते.




तसेच या कार्यक्रमात भारतीय बौध्द महासभेचे भंतेजी धम्मपाल, केंद्रीय प्रशिक्षण विभागाचे सचिव अनिल मनोहर गुरुजी, ठाणे जिल्हा अध्यक्ष विजय गायकवाड गुरुजी, महिला अध्यक्षा शिलाताई तायडे, संरक्षण उपाध्यक्ष हिरामण पगारे, उल्हासनगर तालुका सरचिटणीस संदीप उबाळे, कोषाध्यक्ष जीवन मोरे, उपाध्यक्ष देविदास कांबळे, पी एन पंडित, संरक्षण सचिव महेंद्र निकुंभ, सचिव सोमाजी खैरनार, भास्कर सरोदे, प्रकाश जाधव, उल्हासनगर तालुका महिला अध्यक्षा कल्पनाताई वानखेडे, सरचिटणीस सुमनताई वाघ, संरक्षण उपाध्यक्ष माधुरी खुरगडे, सचिव गयाताई नरवाडे, रेखाताई ओंकार, सुभाष नगर शाखेचे अध्यक्ष अशोक एफ शिरसाट, आणि उल्हासनगर तालुका अंतर्गत विभागीय शाखेचे अध्यक्ष, पदाधिकारी यांच्यासह समता सैनिक दलाचे सैनिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

## ढोर समाज देशव्यापी मेळाव्यात नवे शिक्षण धोरण, आरक्षण वर्गीकरणावर चर्चा

## पुढच्या पिढीला चांगले शिक्षण देवून सक्षम केले पाहिजे

# कक्कय्या आर्थिक विकास महामंडळासाठी प्रयत्न सुरू : सुशीलकुमार शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मागासवर्गीय गटात ढोर समाज संख्येने कमी असला तरी आर्थिक विकास महामंडळाची गरज आहे आणि त्यासाठी राज्यशासनाकडे पाठपुरावा करून कक्कय्या आर्थिक विकास महामंडळासाठी प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

ढोर समाजाच्या देशव्यापी मेळावा रविवारी हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रत्नमाला सावनूर, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, धर्माजी सोनकवडे, गुरूमाता, राजेश खंदारे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

समाजाचा विकास करायचा असेल तर मी समाजासाठी काय योगदान दिले आहे याचे आत्मचिंतन करून सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. पुर्वीच्या लोकांनी काय केले त्यापेक्षा यापुढे काय करायचे आहे यावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. आपला समाज लोकशाही मानणारा आहे. आम्ही मूठभर असलो तरी सुशिक्षित आहोत. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात संघर्ष केला पाहिजे तरच यश प्राप्त होते कोणत्याही कामाला लाज वाटू देवू नका असेही सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितले. आरक्षण वर्गीकरणामुळे समाजावर काय परिणाम होणार आहे हे पुढील काळात समजेल परंतु आपण आपल्या पुढच्या पिढीला चांगले शिक्षण देवून सक्षम केले पाहिजे असेही शिंदे यांनी सांगितले.

प्रत्येकाला जातीचा अभिमान असला पाहिजे आणि प्रत्येकाने समाजासाठी काम केले पाहिजे समाजातील मुलींना चांगले शिक्षण दिले पाहिजे असे आपल्या मनोगतामधून माजी केंद्रीय मंत्री रत्नमाला सावनूर यांनी व्यक्त केले.

समाजाच्या विकासासाठी मी कायम सोबत राहणार आहे अनेक अडचणी आहेत आरक्षणामध्ये इतर जाती घुसल्यामुळे आपल्या समाजावर अन्याय होत आहे संघर्ष करावा लागणार आहे त्यासाठी प्रत्येकाने तयारी ठेवली पाहिजे असे प्रतिपादन माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी केले.

प्रारंभी या मेळाव्याचे संयोजक लक्ष्मीदास सोनकवडे यांनी प्रास्ताविक करीत समाजात अंतर्गत जनगणना केली तर आपण किती आहोत याची संख्या कळेल त्यासाठी मोहीम राबवण्यात येत आहे सर्वांनी सहकार्य करावे. समाजातील सक्षम असलेल्यांनी मागे राहिलेल्या समाजबांधवाना मदतीचा हाथ दिला पाहीजे.

ज्यांच्याकडे आहे त्यांनी ज्यांच्याकडे नाही अशा लोकांना मदत केली तर समाज सुधारणा व्हायला वेळ लागणार नाही असे त्यांनी सांगितले.

दिपप्रज्वलन आणि संत कक्कय्या, शिवाजी महाराज, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आदी राज्यातून आलेल्या अनेक मान्यवरांचे स्वागत करण्यात आले त्यानंतर देशभरात समाजाचे नावलौकीक वाढवणार्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रविण होटकर आणि वनिता होटकर यांनी केले तर आभार सटवाजी होटकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी सुधीर खरटकमल, मुन्ना कटके, सच्चिदानंद होटकर, अशोक सदाफुले, रविंद्र शिंदे, संगीता जोगधनकर, शारदा शिंदे, अॅड विद्या कटकधोंड, राजेश कटकधोंड,विनोद होटकर,नित्यानंद सोनकवडे, विनायक होटकर, गणेश शिंदे यांच्यासह अनेकांनी विशेष परिश्रम घेतले. दिवसभर हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या या मेळाव्यासाठी ढोर समाजबांधवांनी मोठ्यासंख्येने गर्दी केली होती.